एम्.जे.भाग - 2 प्रश्नपेढी

## शोध पत्रकारिता ( Investigative Reporting )

1. शोध पत्रकारिता म्हणजे काय? शोधपत्रकारितेचे वेगळेपण कोणते?
2. एखाद्या शोध कथेच्या आधारे शोधपत्रकारितेच्या वृत्तांकनाची प्रक्रिया स्पष्ट करा.
3. शोध पत्रकारिता हा सनसनाटी पत्रकिरितेचा एक प्रकार आहे या विधानाची चर्चा करा.
4. शोध पत्रकारिता हा विशेष वृत्तांकनाचा प्रकार जोपासण्यासाठी लागणा-या अंगभुत कौशल्याची माहिती द्या.
5. शोध पत्रकारितेसाठी विषय कोठून व कसे मिळतात? त्यासाठी कोणते स्त्रोत वापरले जातात.
6. स्टिंग ऑपरेशन,ऑपरेशन दूर्योधन किंवा तहेलका डॉट कॉम ने शोधलेली प्रकरणे शोधपत्रकारितेत मोडतात का? चर्चा करा
7. शोध पत्रकारितेत पत्रकारांसमोर कोणती आव्हाने असतात?
8. शोध पत्रकारिता करताना कोणती खबरदारी घ्यावी लागते?कोणती पथ्ये सांभाळावी लागतात?.
9. शोध पत्रकारितेतील माहिती विश्वासार्ह हवी,अन्यथा अशी प्रकरणे बूमरँगसारखी उलटू शकतात या विधानाची सविस्तर चर्चा करा.
10. शोध पत्रकारिता करताना प्रसंगी जीव धोक्यात घालावा लागतो,शोध पत्रकारितेतील काही उदाहरणे देउन स्पष्ट करा

-----------------

एम्.जे भाग -2 प्रश्नपेढी

(Feature writing )

1) बातमी आणि वृत्तलेख यातील फरक स्पष्ट करा.

2) बातमी आणि वृत्तलेख यातील फरक लक्षात घेता उत्तम वृत्तलेखनासाठी लेखकाने कोणती पूर्वतयारी केली पाहिजे

3) वृत्तलेख हा बातमीपेक्षा वेगळा असल्याने त्यासाठी पूरक माहिती कोठून मिळू शकते

4) वृत्तलेखाचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करा

5) लेख आणि वृत्तलेख यातील साम्य स्थळे व फरक स्पष्ट करा.

6) वृत्तलेख लिहिताना कोणत्या मूलभूत गोष्टी लक्षात घेयला हव्यात

7) वृत्तलेखासाठी इंटरनेट माध्यमाचा उपयोग होउ शकतो का? कसा?

8) वृत्तांत,वृत्तलेख आणि लेख यातील फरक व साम्य स्पष्ट करा.

9) केंद्रीय अर्थमंत्री पी चिदंबरम यांनी सादर केलेल्या सन 2007-2008 या वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या पार्श्वभूमीवर तुम्ही वृत्तलेखासाठी कोणते विषय निवडू शकाल

10)ठेवीवरील घटते दर किंवा सरकारी कर्मचा-यांना यापुढे निवृत्ती वेतन नाही या बातम्यांच्या आधारे एक वृत्तलेख तयार करा.

11)वृत्तपत्रीय लेख म्हणजे वर्तमानाशी निगडीत लिखाण परंतु ती निखळ किंवा तातडीची बातमी नसते ( Hard News ) या विधानाचे उदाहरणांसह स्पष्टीकरण करा.

12)वृत्तलेख म्हणजे सखोल बातमी ( News in depth ) या विधानाची चर्चा करा.

13)व्यक्तीविशेष लेख किंवा ( personality Feature ) म्हणजे काय? उदाहरणांसह स्पष्ट करा.

14)टीपा द्या.

1) ऐतिहासिक लेख 2) मुलाखतीच्या आधारे लेख 3) वृत्तलेख

4) हलके फुलके लेख 5) वीजटंचाईचे परिणाम

15)राजकीय लेखांचे वाचकांच्या दृष्टीने महत्व काय?

16)लोकरूची लेखांचे वृत्तपत्रातील स्थान कोणते

17)आंतरराष्ट्रीय घडामोडींवरील लेख लिहिताना संदर्भ कसे मिळवावेत.

18)वृत्तपत्रीय लेखात मनप्रतिज्ञादाराचे महत्व कोणते?

19) प्रचलित विषयावर लेख लिहिताना कोणत्या बाबींना महत्व द्यावे.

20) नीठारीतील बालक हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर मानवी अवयवांचा व्यापार या विषयावर वृत्तलेख लिहा.

---

एम.जे. भाग - 2 प्रश्नपेढी

## Editorial Writing

1. अग्रलेख म्हणजे काय? अग्रलेखांचे वर्गीकरण तुम्ही कसे कराल? उदाहरणासह सांगा.
2. अग्रलेख म्हणजे वृत्तपत्रांचा आवाज. वृत्तपत्राच्या धोरणाचा अग्रलेखाच्या मांडणीवर परिणाम होतो काय?स्पष्ट करा.
3. संपादकीय लेखनातून ( अग्रलेखातून ) समाजाला दिशा मिळु शकते, या विधानाची चर्चा करा.
4. अग्रलेख किंवा संपादकीय लिखाणाची पथ्ये कोणती.
5. अग्रलेख लिहाणा-याला अग्रलेखासाठी संदर्भ साहित्य कोठून मिळते ?
6. प्रत्यक्ष अग्रलेख लिहिताना संपादकाला कोणत्या गोष्टीकडे लक्ष केंद्रीत करावे लागते.
7. अग्रलेखाचे शीर्षक किंवा मथळा चित्तवेधक असल्यास निम्मे काम फत्ते होते या विधानाची चर्चा करा.
8. अग्रलेख मांडणी, सौंदर्य, भाषा या अनुषंगाने परिणामकारक अग्रलेखाची चर्चा करा.
9. ›अग्रलेख म्हणजे संपादकाचे चिंतन‹ या विधानाची चर्चा करा.
10. खालील विषयावर अग्रलेख लिहा. कोणत्याही एका शीर्षक द्या
    1. सद्दामला फाशी
    2. चिमूर, दर्यापूरमधला काँग्रेसचा विजय
    3. नागपूरचे मराठी साहित्य संमेलन
    4. महिला आरक्षण विधेयक लांबणीवर
    5. मध्यम वर्गीयांना भरडणारे अंदाजपत्रक
    6. शेअर बाजारात तेजी
    7. निठारीतील बाल हत्याकांड
11. वृत्तपत्रात अग्रलेख महत्वाचा समजला का जातो ? अग्रलेखाच्या विविध हेतुसह स्पष्ट करा.
12. तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही अग्रलेखाची उदाहरणासह चर्चा करा.
13. अग्रलेखाच्या व्याख्या सांगून त्याचे प्रकार त्याच्या वैशिष्ट्यासह स्पष्ट करा.
14. अग्रलेख हा वृत्तपत्राचा आवाज किंवा आत्मा असतो. तो कसा? हे सोदाहरण स्पष्ट करा.
15. अग्रलेखामुळे वृत्तपत्रांचा प्रभाव वाढतो हे संयुक्त महाराष्ट्र चळवळ किंवा अन्य आंदोलनाच्या काळातील विविध अग्रलेखांच्या आधारे स्पष्ट करा.
16. लो. टिळकाच्या अग्रलेखाने जनजागृती केली. ›केसरी‹तील तत्कालीन अग्रलेखांचे संदर्भ देऊन स्पष्ट करा.

---

एम्.जे.भाग - 2 प्रश्नपेढी

नियतकालिकांचे संपादन (Magzine & Suppliment editing)

- वर्तमानपत्रांसोबत पुरवण्या देण्याची आवश्यकता का असते ?
- वर्तमानपत्रांच्या पुरवण्यांमध्ये वैविध्य कसे राखले जाते ?
- रविवार आवृत्तीमधील विषय हे ताज्या बातम्या तसेच ललित साहित्याच्या जवळचे असावेत असे म्हटले जाते ते का ?
- चित्रपट विषयक पुरवण्यात कोणते प्रकार हाताळले जातात?.
- मुलांसाठी असलेल्या पुरवण्यातून कोणते विषय घेतले जातात.
- तुम्हाला आवडणा-या एखाद्या लहान मुलांसाठीच्या पुरवणीची वैशिष्टे सांगा.
- महिलांसाठी असलेल्या पुरवण्यांसाठी कोणते विषय निवडले जातात?
- गृहसजावट, पुष्परचना, पाककृती या विषयातील मजकुराचे महिलांच्या पुरवणीतील महत्व स्पष्ट करा.
- गृहपत्रिका म्हणजे काय ? गृहपत्रिका संपादकाला त्यासाठी कोणते विषय हाताळावे लागतात.
- तुम्ही छोट्या मुलांच्या मासिकाचे संपादक आहात. तुम्हाला या मासिकाचा सुट्टी विशेषांक काढायचा आहे. त्यासाठी कोणते विषय घ्याल ? त्यासाठी लेखकांशी पत्रव्यवहार कसा कराल ?
- शैक्षणिक - विषयावरील नियतकालीकाच्या संपादनात कोणत्या अडचणी येऊ शकतात ?
- दैनिकासोबतच्या पुरवण्यांचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करा, क्रीडा विषयक पुरवणीत कोणते विषय देता येतील?.
- दैनिकासोबतच्या दिल्या जाणा-या पुरवण्यांच्या नियोजनातील घ्पेज ले आउट आर्टीस्टङचे काम स्पष्ट करा.
- दिवाळी अंक हा एक स्वतंत्र उद्योग बनला आहे. घदिवाळी अंकांची बाजारपेठङ या विषयावर टीपण तयार करा.
- दिवाळी अंकांच्या निर्मितीच्या पूर्व तयारीचे घटक कोणते ? लेखन, संपादन आणि निर्मिती पर्यंतची प्रक्रिया स्पष्ट करा.

---------------------------------------------------

M. J. भाग - 2 प्रश्नपेढी

केंद्र व राज्य स्तरीय वार्तालेखन - गुण 100

1) संसदेतील किंवा विधिमंडळातील प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्व स्पष्ट करा.

2) संसद किंवा विधिमंडळ सदस्यांचे विशेषाधिकार कोणते? माहिती मिळविण्यासाठी त्यांना कोणती आयुधे वापरता येतात.

3) राष्ट्रपती पदाची निवडणूक कशी होते? त्यासाठी आर्हता काय?

4) विधिमंडळात एखादे विधेयक संमत होण्याची प्रक्रिया स्पष्ट करा.

5) राष्ट्रपतींचे किंवा राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे काय, या अभिभाषणातून सरकारचे धोरण स्पष्ट होते काय? तुमची मते लिहा.

6) शेतक-यांच्या आत्महत्येची कारणे स्पष्ट करुन आर्थिक मदतीने या हत्या थांबतील असे तुम्हाला वाटते का?

7) माहितीच्या अधिकाराच्या कायद्यातून सर्वोच्च न्यायालय. केंद्रीय लोकसेवा आयोग आदींचा अपवाद करणे योग्य होईल काय, तुमची मते स्पष्ट करा.

8) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न गुंतागुतीचा बनला आहे, या प्रश्नाची उकल नजीकच्या भविष्यकाळात कशी होऊ शकते, तुमच्या मतांच्या स्पष्टीकरणासह लिहा.

9) विशेष आर्थिक क्षेत्राखाली (S E Z) उद्योगांना सवलती देताना शेतकरी वर्गाच्या हिताकडे दुर्लक्ष होत आहे

10) नुकत्याच झालेल्या महापालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे निष्कर्ष सविस्तर स्पष्ट करा.

11) राज्यातील दंगली या विषयावर सविस्तर टीपण तयार करा.

12) तुमच्या भागातील वीज, पाणीपुरवठा, रस्ते या संदर्भातील समस्यांवर आधारीत वृत्तलेख तयार करा.

13) शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तुम्ही काय उपाय योजना सूचवाल? टीपण तयार करा.

14) लोकसभेची रचना कशी असते, लोकसभा सदस्यांची निवड कशी केली जाते?

15) या वर्षाच्या अंदाजपत्रकात मध्यम वर्गियांना फटका बसला आहे, या मताशी तुम्ही सहमत आहात का?

16) या वर्षाच्या (2007-2008) अंदाज पत्रकाची वैशिष्टये स्पष्ट करा.

17) टिपा लिहा.

1. प्रश्नोत्तराचा तास 2. शून्य प्रहर 3. लक्ष्यवेधी सूचना

4. सदस्यांचा हक्कभंग 5. राष्ट्रपतींची शक्ती स्थाने 6. विधिमंडळाची रचना

7. नवे सरन्यायाधीश

---

M.J. भाग - 2 प्रश्नपेढी

क्रीडा पत्रकारिता

1) क्रीडा वृत्तांचे स्त्रोत कोणते ?

2) क्रीडा वृत्तांची निवड करताना कोणते निकष लावतात.

3) क्रीडा पत्रकारितेचे वेगळेपण कोणते ?

4) क्रीडाविषयक बातम्यामध्ये छायाचित्रांचे महत्व कोणते ?

5) क्रीडा विषयक अग्रलेखांचे स्वरुप स्पष्ट करा.

6) साप्ताहिक क्रीडा पुरवण्यांचे स्वरुप स्पष्ट करुन या पुरवण्यांचे नियोजन कसे केले जाते हे लिहा.

7) क्रीडा वृत्तलेखाची वैशिष्टे स्पष्ट करा.

8) क्रीडा विषयक स्तंभ लेखनाचे स्वरुप स्पष्ट करा. अशा स्तंभाची भाषाशैली कशी हवी याविषयी लिहा.

9) विसाव्या शतकातील खेळांच्या विकासातील टप्पे स्पष्ट करा.

10) क्रीडा स्पर्धांचे वर्गीकरण कसे कराल; दैनिकासाठी कोणते क्रीडा प्रकार हाताळले जातात?

11) तुम्ही एका दैनिकाचे क्रीडा संपादक आहात. या दैनिकासाठी साप्ताहिक क्रीडा पुरवणी तुम्हाला द्यायची आहे. या पुरवणीचे नियोजन तुम्ही कसे कराल? सविस्तर लिहा.

12) क्रीडा पत्रकार म्हणजे क्रीडा वृताची ने आण करणारा घ्टपालवालाङ नव्हे, तो व्यासंगी, अभ्यासु, विचारवंत आणि जिज्ञासु हवा या विधानाची चर्चा करा.

13) क्रीडा पत्रकारितेतील आव्हाने कोणती?

14) राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा बालेवाडी येथे होणार आहे. या दृष्टीने क्रीडा पुरवणी, स्पर्धेची पूर्वतयारी प्रत्यक्ष स्पर्धा व त्यानंतरचे वातावरण या संबंधी लेख, स्तंभलेख, वृत्त संकलन, छायाचित्रे इत्यादी संबंधी कसे नियोजन करणार व कशी अंमलबजावणी करणार?

15) विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसंबंधी कशी तयारी करणार? स्पर्धाचे वृत्त, स्तंभलेखन पानाची आखणी आदी संबंधी कसे नियोजन करणार?

16) ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा जुलै 2008 मध्ये होणार आहे. या संबंधी स्पर्धेपूर्वी, प्रत्यक्ष स्पर्धा याबाबत लेख, विशेष लेख, वृत्त संकलन पानाची मांडणी कशी करणार?

17) राष्ट्रीय क्रीडा दिन केव्हा साजरा केला जातो? त्याचा उद्देश काय असतो? या दिनांचे औचित्य साधुन कोणत्या खेळाडूसंबंधी विशेष लेख लिहिणार?

18) शिवछत्रपती पुरस्कार क्रीडा समारंभ तुमच्या गावात होणार आहे, त्यानिमित्त लेख, मुलाखती, वृत्ताचे संकलन व पानाची मांडणी कशी करणार?

19) विक्रमवीर सुनील गावसकर यांची मुलाखत घेण्यासाठी पूर्वतयारी कशी करणार? या मुलाखतीसाठी दहा प्रश्न तयार करा.

20) टीपा लिहा :-

1. भारतीय ऑलिंपिक संघटना
2. हॉकीतील भारताची निराशाजनक कामगिरी
3. सानिया मिर्झा भारताचे आशास्थान
4. क्रीडापटु व मॉडेलिंग
5. क्रीडापटु व उत्तेजके
6. क्रीडा क्षेत्रामधील राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप
7. शालेय जीवनात क्रीडा क्षेत्राचे महत्व
8. जगमोहन दालमियांची हाकालपट्टी
9. क्रिकेटपटुवर संसद नाराज

----------